UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

Scanned by CamScanner

Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue IX Vol III , May. To Oct. 2017 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143


## Index


| Sr. No. | Article Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | साहित्य और इतिहास भूषण के काव्य के विशेष सन्दर्भ में | संतोष साहेबराव नागरे | 1 |
| 2 | सामाजिक सरोकारिता को निबाहती राजन स्वामी की गज़ल | डॉ. संजय सोपान रणखांबे | 3 |
| 3 | हिंदी गज़लों में आतंकवाद की भयावहता | डॉ. बंग नरसिंगदास ओमप्रकाश | 7 |
| 4 | विषय : साहित्य समाज और हिंदी सिनेमा : एक चिंतन | प्रा.डॉ.एन.ए.येल्लूरे | 10 |
| 5 | बौद्ध दर्शन और असंगघोष की कविता | डॉ.संजय जाधव , प्रा.डहाळे मुंगाभाऊ | 13 |
| 6 | प्रतीक नाटक परम्परा और भारतेंदु के नाटक | प्रा. खराडे आर.एम. | 18 |
| 7 | खिलाडियों के जीवन में संतुलित आहार और व्यायाम का महत्व | प्रा. अतुल शर्मा | 22 |
| 8 | राष्ट्रीय एकता में शिक्षा का योगदान | डॉ. प्रविण कांबळे | 24 |
| 9 | इक्कीसवी सदी में दलित आन्दोलन | प्रा.डॉ.सौ.मंगला बी. कठारे | 26 |
| 10 | सर्वेश्वरदयाल सक्सेन कृत 'लड़ाई' नाटक की प्रासंगिकता | प्रा.डॉ.संजय जाधव | 28 |
| 11 | "मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक सांख्यिकीय विश्लेषण" | डॉ.नंदकिशोर मुळे | 34 |
| 12 | "मराठवाड्यातील भूमिहीन शेतमजुर : एक सांख्यिकीय विश्लेषण" | शिंदे भगवान | 38 |
| 13 | कापूस आदान-प्रदान किंमत विश्लेषण | डॉ. बोत्रर रेणुकादास यशवंत | 41 |
| 14 | 'लीळाचरित्र' ग्रंथातून चक्रधर स्वामींनी सांगितलेला उपदेश | डॉ. विजयकुमार शिवदास बोले | 45 |
| 15 | नागनाथ कोत्तापल्ले यांचे काव्यविश्व | प्रा. डॉ. मारोती माधवराव घुगे | 48 |
| 16 | बहिणाबाईची कविता | प्रा. डॉ. मारोती रामराव कोल्हे | 53 |
| 17 | आदिम काव्यातील थोर महात्मे | प्रा. डॉ. राजेश धनजकर | 57 |
| 18 | 'सोनचफा' व 'कस्तुरीमृग' जीवनाचा शोध घेणारी नाट्यकृती | डॉ.संदीप अ.बनसोडे | 62 |





Scanned by CamScanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue IX Vol III , May. To Oct. 2017 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# 'सोनचाफा' व 'कस्तुरीमृग' जीवनाचा शोध घेणारी नाट्यकृती

डॉ.संदीप अ.बनसोडे
मराठी विभागप्रमुख,
र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई जि.बीड

--------------- (18) --------------------Dept. of Marathi ---------------------------------------------

वसंत कानेटकर हे आधुनिक मराठी साहित्यातले आणि रंगभूमीवरचे असे महत्त्वाचे नाटककार आहेत ज्यांना देशपातळीवरचे अनेक मानसन्मान मिळाले कारण नाट्यक्षेत्रातला त्यांचा संचार प्रदीर्घ अशा स्वरूपाचा आहे. त्यांनी वेड्याचं घर उन्हात, देवाचं मनोराज्य, प्रेमा तुझा रंग कसा?, रायगडाला जेव्हा जाग येते, दोन ध्रुवावर दोघे आपण, मत्स्यगंधा, मोहिनी, अश्रुंची झाली फुले, लेकुरे उदंड जाली, इथे ओशाळला मृत्यू, घरात फुलला पारिजात, मला काही सांगायचंय, तुझा तू वाढवी राजा, मीरा मधुरा, हिमालयाची सावली, बेईमान, अखेरचा सवाल, नल दमयंती, विषवृक्षाची छाया, कस्तुरीमृग, माणसाला डंख मातीचा, तू तर चाफेकळी, सूर्याची पिल्ले, एक रूप : अनेक रंग, गोष्ट जन्मांतरीची, जिथे गवतास भाले फुटतात, गाठ आहे माझ्याशी, कधीतरी कोठेतरी, पंखांना ओढ पावलांची, छू मंतर, गगनभेदी, प्रेमाच्या गावा जावे, वादळ माणसाळतंय, मदनबाधा आणि सोनचाफा इ. विपुल नाट्यलेखन कानेटकरांनी केलेले आहे.

कानेटकरांनी विपुल नाट्य लेखन तर केलेच पण त्यांच्या नाटकांनी नाट्यलेखनाची नवी दिशाही दाखवून दिल्याचे दिसते. उदा. 'वेड्याचं घर उन्हात' हे नाटक मनोविश्लेषणात्मक तर 'रायगडाला जेव्हा जाग येते' हे ऐतिहासिक व 'प्रेमाच्या गावा जावे' हे सुखात्मिका जपणारे, अशा प्रकारे त्यांचे प्रत्येक नाटक म्हणजे त्या त्या क्षेत्रातला एक मैलाचा दगड ठरले आहे यात शंका नाही. त्यांचे मन भूतकाळात जास्त रमते. गेल्या शतकातील विशेषतः उत्तरार्धातील काही महत्त्वाच्या व्यक्ती सोबत घेऊन काही कलाकृती त्यांनी निर्माण केल्या आहेत. धोंडो केशव कर्वे आणि वि.का.राजवाडे या दोन महापुरुषांबद्दल त्यांना आदर आहे. म्हणूनच 'हिमालयाची सावली' आणि 'विषवृक्षाची छाया' या दोन नाटकांची निर्मिती त्यांनी केली. हिराबाई पेडणेकर ज्या एक उत्तम नाट्यकर्ती होत्या त्यांच्याबद्दलही त्यांच्या मनात कुतूहल आहे, आणि म्हणूनच 'कस्तुरीमृग' या नाटकामध्ये ते हिराबाईच्या जीवनाचा शोध घेण्याचा आणि त्यांच्या कलावंत मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

वसंत कानेटकरांनी नाट्य लिखाणात महत्त्वाच्या व्यक्तींना स्थान दिलेच आहे ते कधीही त्यांना विसरत नाहीत, आणि त्यांच्याबद्दलचा आदर ते त्यांच्या लेखणीतून प्रकट करतात. जसे नाट्यात ज्यांचा उल्लेख करता येईल अशांना लेखणीच्या माध्यमातून त्यांना मान देतात तसेच नाटक कलावंतापर्यंत पोहचवणारांच्या भावनाही ते लक्षात घेऊन ते त्या कलावंतासाठीही नाट्यलेखन करताना दिसतात उदा. 'सोनचाफा' हे नाटक त्यांनी नाट्य कलावंत मोहन वाघ यांना लिहून दिल्याचे प्रस्तुत नाटकाच्या प्रस्तावनेवरून समजते.

**सोनचाफा**

सोनचाफा हे नाटक कानेटकरांनी 1986 साली लिहून प्रकाशित केले. सोनचाफा हे नाटक तसे पाहू जाता स्त्री केंद्रस्थानी असल्याचे दिसते. या नाटकातील योगितादेवी ही जितेंद्र शिलाहार यांची पत्नी असून जितेंद्र हा स्वातंत्र्यपूर्व काळात ज्यांची ज्यांची संस्थाने होती, त्या संस्थानिकांपैकी एक श्रीमंत शिवाजी महाराज यांचा धाकटा मुलगा आहे.

जितेंद्र हा वडिलांच्या इच्छेविरुद्ध सैन्यात गेलेला असून तो तीन वर्षांपूर्वी युद्धकैदी म्हणून ब्रह्मदेशाच्या युद्धात पकडला गेला. पुढे तो आझाद सैन्यात दाखल झाला. इम्फाळच्या लढाईत दोन वर्षांपूर्वी कामी आला. तेव्हापासून योगिताचा वनवास सुरू झाला. योगिता रतनला म्हणजे तिच्या मुलाला घेऊन मुंबईतील गिरगावातल्या केळुसकरांच्या चाळीत एकटी राहते आहे. कारण जितेंद्रचा हा प्रेमविवाह होता जो त्याच्या पित्याला (श्रीमंत शिवाजी महाराज) यांना मान्य नव्हता. अशी ही योगिता आपल्या मुलाला घेऊन शिवणकाम करून आपला उदरनिर्वाह भागवते.

पुढे कालांतराने शारंगधर संस्थानाच्या म्हणजे श्रीमंत शिवाजी महाराजांच्या संस्थानाचा दिवाण (बाहुराव) यांना पाठवून नातू रतन याला आणायला सांगितले जाते आणि काही अटी घालून योगिता रतनसह शारंगधर येथे राहण्यास जाण्यासाठी तयार होते. पुढे रतन यालाच शारंगधरच्या गादीवर, वहावे हिंमत बहादर म्हणून रतनला बसवण्याची श्रीमंत शिवाजींची तयारी असते परंतु मध्येच हिंदुस्थान सरकारच्या संस्थानी खात्यातर्फे लखोटा येतो आणि त्यात गादीवर मंजुळेच्या मुलाचा हक्क पोहचतो असे फर्मान येते. मंजुळा ही सिनेमात काम करणाऱ्या नटीच्या प्रेमात शिवाजींचा मोठा मुलगा रणजीत पडलेला असतो आणि त्याच्यापासून तिला झालेल्या मुलाचाच



Scanned by CamScanner

गादीवर हक्क पोहचतो असे सांगत ती शिवाजीविरुद्ध कोर्टात जाऊन हक्क मिळवू पाहात आहे. तर एकीकडे सासऱ्याच्या विरुद्ध लग्न केल्याने नवऱ्याच्या मृत्यू नंतर सासरा मुलगा रतन आणि स्वतः योगिताला जवळ घेईल अशी अपेक्षाही न बाळगणारी योगिता स्वतंत्र राहून आपला उदरनिर्वाह स्वतः करीत असते. पुढे कथानक बदलते आणि शिवाजी महाराजांचे जावाई शोध लावतात की, मंजुळेचा मुलगा हा रणजितपासून झालेला नसून तो तिच्या पहिल्या नवऱ्यापासून झाला आहे येथेच मंजुळेचा डाव लक्षात येतो. आणि रीतसर रतनलाच गादी मिळण्यास मदत होते व शिवाजी महाराजांना झालेला योगिता बद्दलचा गैरसमज दूर होऊन नाटकाचा शेवट सुखांत होतो.

'सोनचाफा' मधील 'योगिताचे'

योगिता ही अनाथ आश्रमातील मुलगी असून सारंगपरचे संस्थानिक श्रीमंत शिवाजी महाराजांचा धाकटा मुलगा जितेंद्र हा तिचा पती आहे. हा वडिलांच्या इच्छेविरुद्ध सैन्यात गेलेला असून तो तीन वर्षांपूर्वी युद्धकैदी म्हणून ब्रह्मदेशाच्या युद्धात पकडला गेला. पुढे तो आझाद सैन्यात दाखल झाला. इम्फाळच्या लढाईत दोन वर्षांपूर्वी कामी आला. तेव्हापासून योगिताचा वनवास सुरु झाला. योगिता रतनला म्हणजे तिच्या मुलाला घेऊन मुंबईतील गिरगावातल्या केळुसकरांच्या चाळीत एकटी राहते आहे. कारण जितेंद्रचा हा प्रेमविवाह होता जो त्याच्या पित्याला श्रीमंत शिवाजी महाराज यांना मान्य नव्हता. अशी ही योगिता आपल्या मुलाला घेऊन शिवणकाम करून आपला उदरनिर्वाह भागवते. आणि जेव्हा मुलाच्या भविष्यासाठी ती संस्थानात जाण्याचा विचार करते तेव्हा ती स्वतः काही अटी महाराजांना घालते. सासऱ्याकडे राहूनही स्वतःचा उदरनिर्वाह स्वतः करताना योगिता दिसते. प्रसंगी सासऱ्याला म्हणजेच महाराजांना "घर म्हणजे शोभिवंत संगमरवरी इमारत नव्हे; गाद्या गिरद्या, पडदे, गालिचे आणि फर्निचर नव्हे, पंचपक्वान्न नव्हेत की सोने, मोती, हिरे नव्हेत, हे असायला हरकत नाही. पण ही सगळी रेलचेल असूनही घरात घरपण असेलच असं नाही घर म्हणजे माणसं प्रेमळ, मायाममता करणारी माणसं."[4] असं ठणकावून सांगताना दिसते. आणि पुढे जेव्हा आपल्या मुलाला गादीवर बसता येणार नाही हे तिला माहीत होते तेव्हाही कुठलाही ताण न घेता ती श्रीमंतांना म्हणजेच तिच्या सासऱ्याला आम्हाला तुम्ही भेटलात हेच महत्वाचं आता रतनला हक्क मिळाला नाही तरी चालेल. आपण सुखात राहू असे म्हणून आहे त्यात सुख मानणारी आणि मुंबईसारख्या ठिकाणी एकटी राहूनही मुलावर योग्य संस्कार घडवणारी संस्कारीत स्त्री कानेटकरांनी रेखाटली आहे.

एकीकडे एका अनाथ स्त्रीचे चित्र कानेटकर रेखाटतात, तर दुसरीकडे स्त्री ही किती स्वार्थी असू शकते हे ही ते दाखवण्याचा प्रयत्न मंजुळा या पात्राकरवी करतात.

'सोनचाफा' मधील 'मंजुळा'

मंजुळा ही शिवाजी महाराजांचा थोरला मुलगा रणजितची बायको असून त्यानेही मंजुळाशी प्रेमविवाह केलेला होता. मंजुळा जी एक नटी असून त्याने तिचा पत्नी म्हणून स्वीकार केला होता. पुढे त्याचा मृत्यू हा अतिसेवनाने झाला असावा असे लक्षात येते. परंतु त्यानंतर मात्र त्याची पत्नी मंजुळा ही कोर्टामार्फत माझ्याच मुलाला गादीचा हक्क मिळाला पाहिजे म्हणून आक्रमक रूप घेताना दिसते. मात्र तिचा असलेला मुलगा हा रणजितचा नसून तो तिच्या पहिल्या पतीपासून झालेला आहे हे सिद्ध होतं आणि तिने पाहिलेली स्वप्ने भंग पावतात.

अशा प्रकारे शिवाजीची मुलगी अक्कासाहेब हे गौण तर धाकटा मुलगा जितेंद्रची बायको योगिता आणि थोरला मुलगा रणजितची बायको मंजुळा ही तीन स्त्रीचित्रे कानेटकरांनी रेखाटली आहेत. स्त्री स्वभावाची विविध रूपेच जणू काही ते आपल्या समोर ठेवण्याचा प्रयत्न करतात की काय, असे या नाटकाकडे पाहिल्यानंतर वाटते. कारण संपूर्ण नाटक हे योगिता आणि मंजुळा या दोघींच्या भोवती फिरत असल्याचे आपल्या लक्षात येते. ही कलाकृती कानेटकरांच्या जरी नावावर असली तरी ती स्वतंत्र नसून इंग्लंडमध्ये फ्रॅन्सेस हॉजसन बुर्नेट या कादंबरीकार महिलेने 1886 साली, ष्पजजसम स्वतक ध्नदजसमतवलध या कादंबरीची मध्यवर्ती घटना आहे. तरीही स्वातंत्र्यपूर्व काळातल्या आणि दुसरे महायुद्ध चालू असतानाच्या पार्श्वभूमीवरील घटनांची नोंद घेऊन सदरील नाटकाची निर्मिती करण्यात कानेटकर यशस्वी ठरल्याचे दिसतात.

'कस्तुरीमृग'

'कस्तुरीमृग' या नाटकाची नायिका अंजनी ही बुद्धिमान, सुंदर, कवयित्री गायिका आहे. तिची मावशी आणि तालीदार मंगेश यांच्या सहवासात तिची प्रतिमा फुलत असते. मावशीचे यजमान रावबहादूर पेडसे यांची नजर या 14 वर्षांच्या मुलीकडे जाते. त्यांना जून झालेली मावशीपण हवी आहे आणि ही कोवळी भाची पण हवी आहे. तिची गाठ भाऊराव पटवर्धन या देखण्या गायक नटाशी पडते. त्या दोघांची प्रीत जमते. आपल्या 'दामिनी' या नाटकासाठी लिहिलेली पदं ती भाऊरावांच्या स्वाधीन करते. ज्याच्या जोरावर ते नाटक गर्दी खेचते. पुढे पुस्तकाच्या प्रकाशनानंतर अंजनीच्या असे लक्षात येते की, प्रस्तावनेत तबलापेटीवाल्यांचेही आभार मानले गेले, पण तिचा साधा उल्लेखही त्यात आला नाही. तिचा उल्लेख करून श्रीमंत पंढरपूरकरांचा आश्रय त्यांना गमवायचा नाही. अंजनीचे मन तुटून जाते. पण इतक्यात भाऊरावांचा मृत्यू होतो. अंजनीला अत्यंत दुःख होते. तिचे सांत्वन करायला प्रतिथयश लेखक दादासाहेब सरंजामे यायला लागतात. अंजनी त्यांचा आश्रय घेते. त्यांच्याबरोबर नांदेडला जाते.



Scanned by CamScanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue IX Vol III , May. To Oct. 2017 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

तिला तेथे मिळालेली रखेलीची वागणूक पाहून ती उद्ध्वस्त होते. ती परत येते. दारूच्या व्यसनात बुडते. मंगेश तिला आवरू पाहतो पण त्याला यश येत नाही. त्याच्याच मदतीने ती पंत ठेंग्यासारखा यजमान शोधते. आपल्या दारूच्या व्यसनासह त्यांनी आपला स्वीकार केला यातच समाधान मानून त्यांच्याबरोबर राहू लागते.

'कस्तुरीमृग' मधील अंजनी

अंजनी ही अगदी निरागस, निष्पाप, स्वप्नाळू, उत्कट मनोवृत्तीची उत्साहाने आणि तारूण्याने मुसमुसलेली आहे. आपली प्रतिभा, आपली कला आणि त्या कलेचा विकास हा तिच्या जीवनाचा मुख्य उद्देश आहे. आपल्या जीवनाला आपल्याला हवा तसा आकार देता येईल अशा भ्रमात ती आहे. कुठलेही सुख भरभरून देण्याची आणि घेण्याची तिची वृत्ती आहे. मावशीच्या छत्राखाली सुरक्षित जीवन जगल्यामुळे तिला अजून वास्तवाचे चटके बसलेले नाहीत. वाचनामुळे आणि शिक्षणामुळे तिची प्रतिभा फुलू लागली होती. जसा माणूस बोलतो तसाच तो प्रत्यक्षात असेल असे तिला वाटते. आपल्या भोवतालची परिस्थिती, मावशीचे आयुष्य आणि आपले सामाजिक स्थान याबद्दल अंजनीला कल्पना नव्हती असे नाही. गृहस्थाच्या घरी जन्म घेऊनही फरक पडला नसता. तिथेही रोज घरापासून माजघरापर्यंत बटीकपणा करावा लागला असता याची तिला जाणीव आहे. सर्वसाधारण गणिकेचे, लग्न करून संसार करावा व समाजात मानाचे स्थान मिळावे असे स्वप्न असते, परंतु अंजनीचे स्वप्न असे नाही. सदर हिशेबाचा रोखठोक जीवन जगणाऱ्या मावशीला प्रश्न पडला आहे. "ऐक ऐक रे मंगेशा हिला कलावंतपण नको आणि गरतीचाही जन्म नको, बये, मग तुला हवंय तरी काय ?" या गहन प्रश्नाचे उत्तर शोधण्यातच तिचे सारे आयुष्य गेलेले आहे. आपल्याला आवडणाऱ्या पुरूषाबरोबर, जो आपल्याला बरोबरीचे स्थान देईल, त्याच्याबरोबरच राहून साहित्याचा आनंद लुटावा असे तिला वाटते, तसेच आपल्यातल्या प्रतिभेचा आदर पुरूषांनी करावा असेही तिचे मत आहे. परंतु पुरूषांच्या नजरेत मात्र तिची किंमत, भोग घ्यायला उपयुक्त असे एक शरीर एवढीच आहे. रा. ब. पेडसे यांच्याबरोबर रोजभरणी झाली, तेव्हा तिला तयार होणे भागच पडले. नंतर शरीरावर पडलेले ओरखडे भरून आले. तिचे रंगीबेरंगी स्वप्न पाहण्याचे वेड कमी झाले नाही. तिचा बालपणीचा मित्र मंगेश याने दिलेली ताकीद तिच्या धुंद मनात जाऊन पोचलीच नाही. माझ्या वाट्याला जे आयुष्य देईल ते मी पत्करणार नाही. माझ्या सौंदर्याच्या आणि प्रतिभेच्या जोरावर मी माझे आयुष्य हवे तसे घडवीन अशी जिद्द तिला वाटत होती. अशी आशा निर्माण करणारा स्वप्नीचा राजकुमार तिला भेटला. त्याला तिने तिचे सर्वस्व समर्पण केले. ती दारू प्यायला लागते. स्वर्ग दोन बोटे उरलेत असे वाटत असतानाच तिच्या धुंदफुंद मनावर पहिला आघात होतो तो म्हणजे भाऊरावांना आपल्यापेक्षा व्यवहार जास्त महत्त्वाचा वाटतो हे तिच्या लक्षात येते. ती जमिनीवर आपटली जाते. तिच्या स्वप्नाळू मनाला चटके बसायला लागतात. आपल्या मनस्वी स्वभावामुळे ती भाऊरावांबरोबरचे संबंध तोडून टाकते. त्यांच्या अकाली मृत्यूचे तिला खूप दुःख होते. पुढे दादासाहेब सरंजामे यांच्या स्वभावातली दांभिक आणि मित्री बाजू अंजनीला दिसते. तेव्हा भाऊरावांच्या उमद्या स्वभावाची तिला फार आठवण होते. अंजनीसाठी प्रसंगी त्यांनी कंपनीतल्या लोकांशी भांडण केले होते. सदा सर्वकाळ आपल्याबरोबर मिरवले होते. तिच्या स्त्रीत्वाचा अपमान त्यांनी केला नव्हता. दादासाहेबांनी मात्र तिला नांदेडला आणल्यापासून तिचा सतत अपमान केला. त्यांना त्यांची सामाजिक प्रतिष्ठाच मोठी वाटत होती. अंजनीला दारूची, गाण्याची बंदी केली जाते. घरगुती बाईसारखा पोषाख करायला सांगितले जाते. त्याचे तिला काही वाटत नाही पण मी आलो तर भाऊ आला म्हणून सांग हे दादासाहेबांचे वाक्य ऐकून आपल्या पुढे काय वाढून ठेवले आहे याची तिला कल्पना येते. तिने आपले नाटक त्याला अर्पण केलेले दादासाहेबांना अजिबात चालत नाही. माझ्या पैशावर चैनीत ओवाळला निघालीस, तू तुझ्या रक्तावर गेलीस हा आरोप अंजनीला सहन होत नाही. मुंबईहून आलेल्या पार्सलवर त्यांच्या घरचा पत्ता असतो ते पाहून ते चिडतात तेव्हा तुम्ही बायको मानलीत, परक्या गावात बायको ही आपल्या नवऱ्याशिवाय कोणाचा पत्ता देणार? असे दीनपणे ती म्हणते. परंतु नंतर मात्र तिला त्याची चीड येते. कलावंतिणीच्या संस्कृतीपेक्षा पांढरपेशाची संस्कृती काही वेगळी नसते. उलट कलावंतीण म्हणजे पांढरपेशा संस्कृतीला आलेले फळ आहे. प्रियजनांच्या संगतीतील सुग्रास भोजनाची पंगत कधीच संपली. आता रस्त्यावर उभे राहून भवानीचा स्वामीच ठेवले उरले आहे, प्रिय तिच्या ललिते कला किती वगैरे खोटे, शायनेसु पैसा हेच खरे, या आणि अशा शब्दात अंजनी दादासाहेबांची खरडपट्टी काढते. परत मुंबईला गेल्यावर एका गरजू गृहस्थाची योजना केली आहे हे त्यांचे वाक्य ऐकताच ती संतापाने बेभान होते. तिच्या स्वप्नांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतात. तिच्या काव्यात्म मनाचे पंख वास्तवाची आग लागून जळून भस्मसात होतात. उद्ध्वस्त होऊन ती मुंबईला परत येते. आजपर्यंत जे नाकारले तेच तिच्या नशिबी येते. मंगेशाचा तिला फक्त भावनिक आधार आहे. तिला तिच्या व्यसनासकट पोसण्याची त्याची ऐपत नाही. वैकुंठ भटाच्या मदतीने दारूच्या व्यसनासकट स्वीकारणारा पंत ठेंग्यासारखा ती यजमान शोधते. स्त्रीत्वाच्या नशिबी येणारे सारे भोग तिच्या वाट्याला येतात. रावबहादूर पेडशांची ती भक्ष्य होती. भाऊरावांची भारी होती. दादासाहेबांच्या पिंजऱ्यातली मैना तर आता ती ठेंग्याची बटीक आहे.

'कस्तुरीमृग' या नाटकाचा घाट अंजनीच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. नाटकरचनेची बांधेसूद चौकट असल्यामुळे हे नाटक जिथून सुरू होते तिथेच येऊन संपते. पण पहिल्या अंकातल्या परिस्थितीत आणि शेवटच्या अंकाच्या परिस्थितीत पूर्ण बदल झालेला दिसून येतो. वैकुंठभट अंजनीसाठी यजमान



Scanned by CamScanner

शोषायला तयार आहे कारण त्यातून त्याची दलाली सुटणार आहे. म्हणूनच आक्रमक पवित्रा घेऊन ती वैकुंठभटाला घरातून हाकलून देते. शेवटच्या अंकात ती शरीराने थकली आहे, तिची सर्व स्वप्नं पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. वैकुंठभटाला घरी बोलावून यजमान शोधण्याची गळ ती घालते. पहिल्या अंकात यजमान नको तर शेवटच्या अंकात कसलाही यजमान चालेल इथपर्यंत तिचा मानसिक प्रवास झाला आहे. पहिल्या अंकात दारूला कधीही स्पर्श करणार नाही असे म्हणणारी अंजनी शेवटच्या अंकात फक्त दारू आणि दारूच पीत असते. तिसऱ्या अंकातल्या दुसऱ्या प्रवेशात उद्ध्वस्त झालेली अंजनी आपल्याला दिसते. मग नांदेडला काय घडले हे नंतरच्या प्रवेशात समजते. थिजलेल्या डोळ्यांनी दारू पित बसलेली अंजनी पाहताच नांदेडची फेरी अपयशी ठरल्याचे आपल्याला कळते. पण काय घडले असेल अशी उत्सुकता वाटते. दुसऱ्या प्रवेशात नांदेडचा फ्लॅशबॅक संपल्यावर पुन्हा वर्तमानकाळ सुरू होतो. दुसऱ्या प्रवेशात आत्मनाशाकडे होणारी तिची वाटचाल तिसऱ्या प्रवेशात आत्मनाशाच्या टोकाला येऊन पोचते. उद्ध्वस्ततेच्या परिणामाची उत्कटता वाढविण्यासाठी हे जे तंत्र कानेटकर वापरतात, तेच त्यांच्या यशस्वीतेचं गमक ठरलं. शेवटी सुन्न मनानेच प्रेक्षक नाट्यगृहाबाहेर पडतो.

**'कस्तुरीमृग' मधील मंगेश**

हिराबाई पेडणेकरांच्या आयुष्यातील चारही पुरुष कानेटकरांनी जसेच्या तसे रेखाटले आहेत. परंतु हे करताना या परिस्थितीतील नाट्यविषय जास्त गडद करण्यासाठी 'मंगेश' या काल्पनिक व्यक्तिचित्राची योजना कानेटकरांनी केली आहे. त्यामुळे या नाटकाला केवळ हकीकतीचे स्वरूप न येता कलात्मकता लाभली आहे. फार स्वार्थी, बिनचेहऱ्याचे पुरुष आणि निःस्वार्थी पण ठसठशीत चेहऱ्याचा मंगेश या दोन समर्थ बाजू उभ्या केल्याने या नाटकातल्या विरोधी ताणाला घट्ट पीळ बसला आहे. या चारही पुरुषांचा जन्म आणि परिस्थिती त्यांना अनुकूल आहे. हे चारही पुरुष आपापल्या क्षेत्रात कर्तबगार आहेत. भाऊराव आणि दादासाहेब तर नियतीचे लाडके. तिने त्यांना भरभरून दिले आहे. पण एवढे सगळे असूनही त्यांची मने मात्र स्वच्छ नाहीत. स्वार्थाने ग्रस्त आणि अहंकाराने त्यांची मने दूषित झाली आहेत. माणसांचा वस्तू सारखा उपयोग ते करतात. लावण्यवती स्त्री ही त्यांच्या दृष्टीने मनोरंजनाचा विषय आहे. त्यांच्या कर्तृत्वाला फुलवणारे ते एक साधन आहे. उपयोग संपल्यावर फेकून देण्याइतकीच त्या साधनाची किंमत आहे. या उलट मंगेशाचा जन्म प्रतिकूल परिस्थितीत, कलावंतिणीच्या घरी झाला आहे. तिथे पुरुष म्हणजे अडगळीची वस्तू आहे. आईसाठी यजमान शोधण्यासाठी ज्या दिवशी त्याला देवळात जावे लागले त्याच दिवशी नियतीने जे दिले ते निमूटपणे स्वीकारण्याचे धोरण त्याने अवलंबिले. नियती त्याच्या बाबतीत जरी कठोर असली तरी मनाने चांगले राहणे हे त्याच्या हातात आहे. कुणाचा तरी उपयोग करून घेण्यापेक्षा कुणालातरी मदत करावी अशी त्याची भावना आहे. अंजनीवर त्याचे निरतिशय प्रेम आहे. अंजनीच्या पुढे वाढून ठेवलेल्या वास्तवाची त्याला पक्की जाण आहे. कारण तो डोळे उघडे ठेवून या कठोर आणि स्वार्थी जगात जगतो आहे. अंजनीने पाय जमिनीवर टेकवावेत म्हणून त्याने खूप प्रयत्न केले आहेत. या नाटकात कटू परिस्थितीचे भान आणून देणारे सगळ्यात जास्त संवाद मंगेशाच्या तोंडी आहेत. अंजनीची गाठ भाऊरावांशी पडते तेव्हा, मनामध्ये काही शंका धुकधुकत असतानाही त्याला आनंद झाला आहे. भाऊरावांसारखा नटसम्राट आणि अंजनीसारखी प्रतिभासंपन्न नाटककर्ती यांचा प्रीतीयोग पाहताना त्याचे डोळे आनंदाने भरून आले आहेत. अंजनी दारू प्यायला लागते ते पाहून त्याला भयंकर संताप येतो. ही उत्कट आणि मनस्वी मुलगी आपले ऐकणार नाही हे त्याला माहीत आहे. दोन दिवस दारू पिऊन आपला राग शांत करूनच तो अंजनीच्या घरी येतो. अंजनीला सांभाळण्याइतकी त्याची शक्ती नाही म्हणून मूकपणाने प्रेम करत तिच्या आयुष्याचे धिंडवडे पाहत राहणे एवढेच त्याच्या हाती आहे. नाटकामधल्या पुरुष पात्रांमध्ये हे पात्र कमी महत्त्वाचे आहे असे वाटते पण खरोखरी नाटकाचा प्रेक्षकांवर होणाऱ्या अंतिम परिणामामध्ये या पात्राचा वाटा मोठा आहे. फक्त फार स्वार्थी पुरुष कानेटकरांनी दाखवले असते तर नाटकाचा नकारात्मक परिणाम झाला असता. स्त्री पुरुष संबंधातला कठोर, भकास स्तर दिसला असता पण मंगेशामुळे या संबंधातला नितळ स्तर उलगडत गेला आहे. मुख्यतः अंजनीचे असलेले हे नाटक पुढे मंगेशाचे होत जाते पण म्हणून या दोन व्यक्तीचित्रांमधला तोल ढळत नाही. अंजनी उत्कट तर मंगेश सावध, अंजनीला प्रतिभेचे वरदान तर मंगेशाला समजूतदारपणाचे वरदान. अंजनी सुंदर, भोळी, आनंदी, जीवनातले सुख भरभरून लुटू पाहणारी आहे तर मंगेश अबोल, सावध, पोळलेला, नम्र, साधा आणि दुर्बल असा या दोन व्यक्तिचित्रांमधला विरोधी पण कलात्मकतेचा तोल बरोबरीने साधला आहे.

'कस्तूरीमृग' या नाटकातील अंजनीच्या शोकांतिकेला सामाजिक परिस्थितीच जबाबदार आहे. ज्या कुळाला समाजात मानाचे स्थान नाही अशा त्या कुळात अंजनीचा जन्म झाला आहे. देवाची आणि इतर पुरुषांची सेवा करण्यासाठीच या समाजरचनेत त्यांची नियुक्ती झाली आहे. ज्या काळाचे हे नाटक आहे त्या काळात स्त्रीकडे एक व्यक्ती म्हणून पाहिले जात नव्हते. तिला मन असते हेच नाकारले जात होते. केवळ ओंगळ पुरुषांच्या उपयोगी पडणारी एक वस्तू एवढीच तिची किंमत केली जात असे. गरत्याबाईसाठी जिथे क्षणोक्षणी अपमान होत असे तिथे कलावंतिणीला मान मिळण्याचा प्रश्नच नव्हता. स्वच्छंद आयुष्य जगू इच्छिणाऱ्या अंजनीचा बळी घेण्यासाठी धगधगणाऱ्या अंजनीच्या पदरी निराशाच पडली आहे. असंवेदनाशील समाजात तिची फरफट झाली आहे. तिच्या



Scanned by CamScanner

आयुष्यात आलेल्या पुरूषांच्या आपमतलबी स्वभावामुळेच तिची अशी दुरवस्था झाली हे जरी खरे असले तरी या शोकांतिकेचे मूळ अंजनीच्या स्वभावातही दडले आहे. अंजनीचा उत्कट आणि मनस्वी स्वभाव व तिची मोहवशता या गोष्टीही तिच्या या अवस्थेला कारणीभूत झाल्या आहेत. मागे सांगितल्याप्रमाणे पहिल्या अंकात अंजनीचा दारू न पिण्याचा निश्चय दिसून येतो. दुसऱ्या अंकात भाऊरावांच्या दारू पिण्याच्या व्यसनाबद्दल मंगेश जे म्हणतो ते अंजनीलाही लागू पडते. व्यसने कुणी कुणाला लावू शकत नाही. सिद्धता मुळातच असते. कुणी तरी होतो निमित्त मात्र. अंजनीची ही सिद्धता मुळातच होती. निव्वळ भाऊरावांचा आग्रह म्हणून पिणारी अंजनी व्यसनात जास्तीत जास्त गुरफटली जाते. काही वेळा संयमाचा अभावही दिसून येतो. दादासाहेब रात्रीची वाट पाहात असतात, तेव्हा अंजनी म्हणते, "अहो राजे पण माझ्यासारखी रातराणी तुमच्या शब्दानेही फुलून येते. त्यासाठी रात्रीची वाट..." अंजनीच्या उतावळ्या स्वभावाचीही कल्पना येते. भाऊरावांनी नाटकाच्या प्रस्तावनेत आपला उल्लेख केला नाही म्हणून तिला खूप राग येतो. ते गेल्यावर दुःखही तेवढेच होते. भाऊरावांचा फोटो नादेडला न्यायचे ती ठरवते पण त्यावेळी 'भाऊरावांचे नाव सुद्धा काढू नकोस. माझं प्रेम त्यांना कधी कळलेच नाही त्यांना हवं होते फक्त माझे शरीर माझे यौवन' असा त्रागाही व्यक्त करते. असा क्षणात तोळा तर क्षणात मासा होणाऱ्या तिच्या स्वभावामुळे या दुष्टचक्रात ती अडकत गेली आहे.

'कस्तुरीमृग' या नाटकात शोकात्म भाव निर्माण होण्याचे मुख्य कारण अंजनीचे सुजाण कलावंताचे अस्तित्व ही एक शक्ती आणि त्या सुजाण अस्तित्वाचे क्रयवस्तूत रूपांतर करू इच्छिणारी समाजशक्ती, यातल्या संघर्षातूनच हे नाट्य फुलत गेले आहे. अंजनी आणि मंगेश एका बाजूला तर पेंडसे, भाऊराव, दादासाहेब ठेंगे आणि माधवी दुसऱ्या बाजूला असा हा लढा आहे. प्रत्येकाला माणूस म्हणून महत्त्व असावे असा अंजनी मंगेशचा आग्रह आहे तर माणसापेक्षा त्याच्या सामाजिक स्थानाला आणि आर्थिक सुबत्तेला महत्त्व असावे असा इतरांचा आग्रह आहे. आपल्या माधवीसारखे सुरक्षित आयुष्य अंजनीला घालवता आले असते. पण विक्षणाने फुलत गेलेली तिची प्रतिमा असे होऊ देत नाही. तिची देवदत्त प्रतिभा, तिचा ज्ञानमार्गावर चालण्याचा ध्यास, आपल्याला बरोबरीचे स्थान देणाऱ्या प्रियकराबरोबरच्या सहजीवनाची आस, आपल्याबद्दल आपल्या प्रियकरांना नक्की काय वाटते हे सत्य समजाऊन घेण्याची तिची तीव्र धडपड यामुळे या शोकात्म भावाची तीव्रता वाढतच जाते. आपले जेवढे सामर्थ्य होते तेवढे प्राणपणाला लावून आपल्या ध्येयासाठी तिने लढा दिला आहे. या आपल्या धडपडीचे विपरीत परिणामही होऊ शकतील असा विचार मनातही न आणता या मृगजळामागे ती वेड्यासारखी धावत सुटली आहे. ज्यावेळी या प्रयत्नाची व्यर्थता तिच्या लक्षात आली त्यावेळी ती पूर्णपणे मोडून पडली आहे. सारे काही उद्ध्वस्त झाल्याचा, सारे काही उजाड झाल्याचा, सर्वस्वाचा सर्वनाश झाल्याचा विदारक अनुभव तिला आला आहे. आता तिलाच तिच्या विनाशाची ओढ लागली आहे. आता व्याकुळतेचा विकलतेचाही अंत झाला आहे. ती पूर्णपणे सुन्न झाली आहे. सुखदुःखाच्या पलीकडे गेली आहे. शरीर आहे म्हणून त्याला पोसणे भाग आहे आणि उद्ध्वस्तता विसरण्यासाठी दारू पिणेही भाग आहे. आपल्या मनातल्या कलावंतपणाला तिने मूठमाती दिली आहे.

कानेटकरांचे मन भूतकाळात जास्त रमते. गेल्या शतकातील विशेषतः उत्तरार्धातील काही महत्त्वाच्या व्यक्ती सोबत घेऊन काही कलाकृती त्यांनी निर्माण केल्या आहेत. धोंडो केशव कर्वे आणि वि.का.राजवाडे या दोन महापुरुषांबद्दल त्यांना आदर आहे म्हणूनच 'हिमालयाची सावली' मेहनतीने ज्या एक उत्तम नाट्यकर्ती होत्या त्यांच्याबद्दलही त्यांच्या मनात कुतूहल आहे. आणि म्हणूनच 'कस्तुरीमृग' या नाटकामध्ये ते हिराबाईंच्या जीवनाचा शोध घेण्याचा आणि त्यांच्या कलावंत मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात. तसेच नाटक रसिकांपर्यंत पोहचवणाऱ्यांच्या भावनाही ते लक्षात घेतात त्या कलावंतासाठी नाट्यलेखन करताना दिसतात उदा. 'सोनचाफा' हे नाटक त्यांनी नाट्य कलावंत मोहन वाघ यांना लिहून दिल्याचे प्रस्तुत नाटकाच्या प्रस्तावनेवरून समजते.

**संदर्भटीपा**

1) वसंत कानेटकर, सोनचाफा, परचुरे प्रकाशन मंदीर, गीरगाव मुंबई, 400004,
2) वसंत कानेटकर, कस्तुरीमृग, पॉप्युलर प्रकाशन मुंबई 1976, पृ.क्र. 5
3) माधव मनोहर, सोबत, 21 मार्च 1976, पृ.क्र.2
4) ज्ञानेश्वर नाडकर्णी सत्यकथा, मार्च 1984 पृ.क्र.79
5) कमलाकर नाडकर्णी लोकसत्ता 3 ऑगस्ट 1986,
6) खोले विलास, साहित्य, अध्यापन आणि प्रकार, मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई 1987 पृ.क्र.01
7) खोपकर अरूण, गुरूदत्त : तीन अंकी शोकांतिका, ग्रंथाली प्रकाशन मुंबई, 1985,पृ.क्र.81
8) यादव आनंद, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि प्रेरणा, मेहता पब्लीशिंग हाऊस, पुणे 1979
9) पांढरीपांडे सु.श्री., समाज प्रबोधन पत्रिका, जाने/फेब्रु. 1978 पृ.16